ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २५ जून, १९५२ अंक २६

## विविध माहिती

**आफ्रिकेंत भारतीय कापडास वाव**—आफ्रिकेंतील टांगानिकानें आणि इतर वसाहतींनीं आयात होणाऱ्या परदेशांतील कापडावर बरींच बंधनें घातलीं आहेत. हीं बंधनें जपानसारख्या बिगर-पौंडी गटांतील देशांनाच लागू असल्यामुळें भारताला ह्या वसाहतींतून आपली बाजारपेठ अधिक बळकट करण्याची संधि मिळण्यासारखी आहे.

**अखिल भारतीय आंबा प्रदर्शन**—बंगलोर येथील बागायत संघातर्फे भारतांतील आंब्याचें प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. निरनिराळ्या जातीचे आंबे मांडलेल्या कांहीं प्रदर्शकांना बक्षिसें देण्यांत आलीं. आंब्यापासून तयार केलेल्या कांहीं टिकाऊ पदार्थांनाहि बक्षिसें देण्यांत आलीं.

**बर्नार्ड शॉ ह्यांच्या पत्रांची विक्री**—सुप्रसिद्ध नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांनीं प्रख्यात नटी मिसेस पॅट्रिक कँपबेल ह्यांना लिहिलेल्या कांहीं पत्रांचा लिलांव करण्यांत येणार आहे. शॉ आणि मिसेस कँपबेल ह्यांची १९१२ पासून १९४० पर्यंत मैत्री होती. १९४० सालीं मिसेस कँपबेल मरण पावल्या. ह्याच काळांतील १२० पत्रांचा हा लिलांव आहे.

**छोट्या ट्रॅक्टर्सची आयात**—भारतीय सरकार १५ अश्वशक्तींपेक्षां कमी अश्वशक्ती असलेल्या ट्रॅक्टर्सच्या आयातीवरील बंदी रद्द करण्याचा विचार करीत असल्याचें समजतें. भारतीय सरकारच्या मतानें हे ट्रॅक्टर्स हानिकारक आहेत. तथापि छोट्या जमीन-मालकांना ते उपयुक्त आहेत, असें कांहीं जणांचें मत आहे.

**समाज-विकास केंद्रें**—भारतांत सुमारें ५५ समाजविकास केंद्रें स्थापन करण्यांत यावयाची असून त्यामुळें एक कोटी लोकांना फायदा होईल. अगदीं मूलभूत स्वरूपाच्या अशा एका केंद्राला ६५ लाख रुपये खर्च येईल आणि विविध स्वरूपाच्या केंद्राला १११ लाख रुपये खर्च येईल.

**वृत्तपत्राचा प्रचंड खप**—अमेरिकेंतील वृत्तपत्रांत न्यूयॉर्क डेली न्यूज ह्या पत्राचा खप सर्वांत अधिक म्हणजे रोज सुमारें ४० लाख प्रती इतका आहे. कागदाचे भाव व इतर खर्च वाढल्यामुळें ह्या पत्रानें आपली किंमत आतां तीन सेंटवरून चार सेंटवर नेली आहे.

**९० लाख कारकून बेकार ?**—कारकुनी कामें विजेच्या साह्यानें करणारें एक स्वयंचलित यंत्र अमेरिकेंत तयार झालें आहे. ह्या यंत्राच्या वापरामुळें ९० लाख कारकून बेकार होण्याची भीति उत्पन्न झाली आहे.

**पोस्ट कार्ड देणारें यंत्र**—नवी दिल्ली येथील पार्लमेंटच्या पोस्ट ऑफिसांत खटका ओढल्याबरोबर पोस्ट कार्ड देणारें स्लॉट मशिन बसविण्यांत आलें आहे. ह्या यंत्राला १९,००० रुपये पडले असून ते स्विस बनावटीचें आहे. फटींतून एक आणा टाकल्यावर एक कार्ड आणि १ पैशाची मोड यंत्रांतून बाहेर पडते. खोटीं नाणीं टाकून ह्या यंत्राला बनवितां येत नाहीं.

**डॉन-व्होल्गा कालवा**—रशिआंतील दोन मोठ्या नद्या, डॉन आणि व्होल्गा, ह्या आतां एका कालव्यानें जोडण्यांत आल्या आहेत. डॉन नदीला कालवा काढून तिचें पाणी पूर्वेला असलेल्या व्होल्गा नदींत सोडलें आहे. ह्या कालव्यामुळें बाल्टिक आणि काळा समुद्र जोडले गेले आहेत.

**पू. पंजाबची राजधानी**—पू. पंजाबची नवी राजधानी चांदीगड येथें बसविण्यांत येत आहे. ह्या कामासाठीं १९५१ अखेर १,०२,३४,००० रुपये खर्च झाले, अशी माहिती पू. पंजाबच्या सार्वजनिक बांधकामाच्या मंत्र्यांनीं सांगितली.

**संमोहन विद्येंतील धोका**—ब्रिटिश पार्लमेंटनें संमोहनाच्या प्रयोगांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. ह्या विद्येमुळें कसे अनर्थ ओढवतात ह्याचें एक उदाहरण पार्लमेंटांत सांगण्यांत आलें. १९५० सालीं एका सार्वजनिक प्रयोगांत एका कामगाराला एक गाणें बँडवर वाजवून मूर्च्छित करण्यांत आलें. तेव्हांपासून तें गाणें ऐकतांच तो आपोआप बेशुद्ध पडूं लागला आहे.

**आंतरराष्ट्रीय बँकेची सावकारी**—आंतरराष्ट्रीय बँकेनें आतांपर्यंत २६ देशांतील २५० योजनांना मिळून १३० कोटी डॉलर्सचें कर्ज मदत म्हणून दिलें आहे. बँकेच्या इतिवृत्तांत ही माहिती देण्यांत आली आहे.

**आहारविषयक प्रयोगशाळा**—लोकांच्या आहारांत असणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांचें आहारशास्त्रदृष्ट्या पृथक्करण करण्यासाठीं लवकरच एक प्रयोगशाळा उघडण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें आहे. पूर्व पाकिस्तानांतहि अशीच व्यवस्था करण्यांत येणार आहे. त्याशिवाय आहार-पृथक्करण विषयक शिक्षणहि देण्यांत येईल.

**भारतांत कच्ची फिल्म तयार होणार !**—म्हैसूर संस्थानांतील कृष्णराजसागर येथें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना काढण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे असें समजतें. ह्या ठिकाणीं कच्चा माल, वीज व पाणी इत्यादि सर्व सोयी अनुकूल आहेत. हवाहि पाहिजे तशी दमट आहे.

**सुगंधी मुर्टीच्या छड्या**—जपानमधील बाजारांत सुगंधी मुटीच्या छड्या लवकरच दिसूं लागतील असें समजतें. गिऱ्हाइकाच्या मर्जीप्रमाणें हवें तें अत्तर मुठींत घालून त्या बनविण्यांत येणार आहेत. पुरुषांच्या छत्रींत उत्तम प्रतीच्या तंबाखूचा सुगंध येईल अशी सोय करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेची परराष्ट्रांना मदत**—अमेरिकेनें परराष्ट्रांना आतांपर्यंत दिलेल्या मदतींचा आंकडा चालू महिन्याअखेर ४ सर्व डॉलर्स इतका मोठा होईल. ह्या मदतीचा लाभ ९० पेक्षां अधिक देशांना झाला आहे. मदतींत लष्करी साहित्य, उधार–उसनवार माल आणि कर्ज ह्या बाबींचा समावेश होतो.

**रंगीत चित्रवाणी**—येत्या ५ वर्षांच्या काळांत ब्रिटनमध्यें रंगीत चित्रवाणीवरून कार्यक्रम प्रक्षेपित करण्यांत येतील असें समजतें. रंगीत चित्रवाणीसंबंधीं ब्रिटन, अमेरिका, हॉलंड व जर्मनी इतक्या देशांतून गुप्तपणें संशोधन चालू आहे.

**चीनकडून तांदूळ मिळाला?**—चीनकडून भारताला मिळालेला तांदूळ वाट चालू लागला असल्याची बातमी पेकिंगला मे दिनानिमित्त गेलेल्या कांहीं भारतीय प्रतिनिधींनीं आणली आहे. ह्या प्रतिनिधींनीं मुकडेन येथील यांत्रिक हत्यारांचा कारखानाहि पाहिला. कारखान्यांत तयार होणारी कापडाच्या धंद्याची यंत्र-सामुग्री आणि पोलाद कापण्याचीं यंत्रें त्यांना फारच पसंत पडलीं.

**किंमत उतरविण्यासाठीं कॉफींत चिकरीची भेसळ**—कॉफीमध्यें चिकरी पूड मिसळण्यास मद्रास सरकारनें जानेवारी, १९५२ मध्यें बंदी केली होती, परंतु मध्यवर्ती सरकारच्या सूचनेवरून तिची अंमलबजावणी तहकूब केली आहे. चिकरी पूड आरोग्यास विघातक नाहीं, आणि ती कॉफींत मिसळल्यामुळें कॉफीची किंमत उतरण्यास मदत होईल, असें मध्यवर्ती सरकारचें म्हणणें आहे.

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

**अधिकृत भांडवल एक कोटी रुपये**

**सन १९४२ ते १९५१ पर्यंत ऑर्डिनरी शेअरच्या भरलेल्या भांडवलावर सिंडिकेटनें दर वर्षी १० टक्के नफा भागीदारांना दिलेला आहे.**

**नवीन मशिनरी जानेवारींत सुरू झाल्यामुळें राहिलेल्या उसाची साखर करण्याकरितां कारखाना जून अखेरपर्यंत चालेल.**

**—: नवीन मशिनरीनें साठ हजार पोतीं साखर :—**

**म्हणजे कंट्रोल दरानें अठ्ठेचाळीस लक्ष रुपयांची साखर तयार झाली.**

**विजापूर जिल्ह्याला दिलेलीः—७,४५४ पोतीं**

**बाकी साखर-पोतीं कोठ्यांत विक्रीकरितां शिल्लक आहेत.**

**शेअरचे व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.**

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. १० मे १९५२.

**चंद्रशेखर गोविंद आगाशे,**
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. २५ जून, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## स्वदेशी यंत्रसामुग्री, इंजिनिअर्स व सरकार

इंजिनें, पंप, नांगर, इत्यादि शेतीस लागणारी यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या महाराष्ट्रांतील कारखानदारांचे वतीनें, एका शिष्टमंडळानें नुकतीच मुंबई राज्याच्या चीफ मिनिस्टरची भेट घेतली व देशी यंत्रसामुग्रीस प्राधान्य देण्याचें सरकारनें ठरवावें, अशी विनंति केली. ह्या शिष्टमंडळांत श्री. लालचंद हिराचंद, श्री. शंकरराव किर्लोस्कर व श्री. ऑर्थर जे. लंड हे होते. मंदीचा कारखानदारांवर प्रतिकूल परिणाम झाला असून, कित्येक कारखानदारांना त्यामुळें कामाचे तास कमी करावे लागले तर कांहींना कामगार कमी करणेंहि भाग पडलें. सरकारनें कारखानदारांजवळ सांठलेला तयार माल उचलला जाण्यास तात्काळ मदत केली नाहीं, तर उत्पादन बंद करण्याची कांहीं कारखानदारांवर पाळी येईल असें शिष्टमंडळानें सांगितल्याचें प्रसिद्ध झालें आहे. सरकारच्या सर्व खात्यांना देशी यंत्रसामुग्रीच घेण्याची सूचना देण्यांत यावी, असें शिष्टमंडळानें सुचविलें.

मंदीपुरता तात्काळ महत्त्वाचा हा प्रश्न नाहीं, हें स्पष्ट केलें पाहिजे. इंजिनिअर्सनीं व्यापक राष्ट्रीय वृत्तीनें आपल्या व्यवसायाकडे पाहिलें पाहिजे; परदेशी मालाची आयात वाढविण्यास सहाय्य करणारे केवळ हस्तक त्यांनीं बनतां कामा नये. यांत्रिक गोष्टींकडे पाहतांना केवळ तांत्रिक दृष्टि उपयोगी नाहीं, तर व्यापक राष्ट्रीय आर्थिक बाजूहि लक्षांत घेणें जरूर आहे. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सचें रौप्य अधिवेशन कलकत्ता येथें १९४५–४६ मध्यें भरलें होतें, त्यामध्यें राष्ट्रीय वृत्तीचे, सुप्रसिद्ध तज्ज्ञ इंजिनियर व कॉन्ट्रॅक्टर श्री. सी. बा. जोशी ह्यांनीं मांडलेल्या व मंजूर करवून घेतलेल्या ठरावाची येथें आठवण होते. "इंजिनिअरिंग शास्त्राची हिंदुस्थानांत प्रगति घडवून यावी ह्या दृष्टीनें सर्व इंजिनिअर्सनीं किंमत व मालाची प्रत ह्यांचा विचार न करतां, शक्य तोंवर स्वदेशी माल, यंत्रसामुग्री व इतर साधनें ह्यांचा वापर करावा व त्यांस उत्तेजन द्यावें" अशी इंजिनिअर्सना विनंति करणारा तो ठराव होता. ह्या ठरावाच्या स्पष्टीकरणार्थ ते म्हणाले, "मालाच्या चांगुलपणाबरोबरच त्याचा स्वस्तपणा हाहि पाहिला पाहिजे, हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. स्वदेशी माल जर चांगल्या प्रतीचा व स्वस्त असेल तर तो न घेणें आपल्या देशाशीं शत्रुत्व दाखविल्यासारखें होईल. परंतु स्वदेशी माल तौलनिक दृष्ट्या थोड्या कमी प्रतीचा व ज्यास्त किंमतीचा असला तरीसुद्धां आपण तो विकत घेतला पाहिजे. अद्यावत् यंत्रसामुग्री, शेकडों वर्षांचा अनुभव, आणि ह्या सर्वांच्या वरची गोष्ट म्हणजे सरकारी पाठबळ विदेशी कारखानदारांजवळ फार मोठ्या प्रमाणावर असतें. म्हणून, थोडीशी अधिक किंमत देऊनसुद्धां प्रत्येक जबाबदार इंजिनिअरनें स्वदेशीच माल विकत घेतला पाहिजे. माल विकत घेतांना त्याच्या प्रतीकडे लक्ष दिलें नाहीं, तर तो माल बनविणारांना वाईट प्रतीचा माल काढण्याची आपण सवलत दिल्यासारखें होईल, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. सद्यःस्थितींत, उद्योगधंद्यावर सरकारी नियंत्रण परिणामकारक असल्यानें, कोणीहि हलक्या प्रतीचा माल मुद्दाम काढणार नाहीं किंवा प्रत सुधारण्यासाठीं केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करणार नाहीं. स्वदेशी माल तयार करणाऱ्या कारखानदारांना तो माल हिंदुस्थानाबाहेर कधींच विकावा लागणार नाहीं असें आपण गृहीत कां धरावें ? त्यांना जर दुसऱ्या देशांत व्यापार करावयाचा असेल तर मालाची प्रत सुधारणें जरूरच आहे. ज्या प्रमाणांत कार्यक्षमता अधिक, त्या प्रमाणांत उत्पादनखर्च कमी, ही व्यवहारी इंजिनिअर लोकांच्या नेहमीच्या अनुभवांतील गोष्ट आहे."

श्री. सी. बा. जोशी ह्यांचें हिंदी तज्ज्ञ इंजिनिअरांतील स्थान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें आहे. त्यांच्या विचारसरणीचा मथितार्थ येथें देण्याचा उद्देश, त्यांतील मुद्दे अद्यापहि पुन: विस्तारानें समजावून सांगण्याची पाळी आलेली आहे, हा आहे. श्री. जोशी ह्यांनीं हिंदी इंजिनिअर्सना स्वदेशी यंत्रसामुग्रीची इतक्या आग्रहानें ज्यावेळीं शिफारस केली, त्यावेळेपेक्षा आतां स्वदेशी उत्पादनाची प्रत कितीतरी सुधारलेली आहे आणि किंमतीमधील तफावतीपुरताच प्रश्न महत्त्वाचा राहिलेला आहे. खाजगी गिऱ्हाईक, इंजिनिअर्स व सरकार ह्या सर्वांनींच ह्या प्रश्नाकडे व्यापक आर्थिक दृष्टीनें पाहिलें पाहिजे आणि सरकारनें अर्थातच त्यांत पुढाकार घेतला पाहिजे. स्वदेशी यंत्र विकत घेतांना, तें ज्यासाठीं घ्यावयाचें त्याबाबत कमींत कमी अपेक्षा त्याचेकडून पुरी झाल्यानंतर बाकीच्या गोष्टींचे बाबतींत सवलत दाखविली, तर त्यामुळें राष्ट्रीय संरक्षणाचा पाया घातला जाईल, ही गोष्ट अजून पटवून द्यावयास हवी काय ?

---

## अन्नाची जागतिक परिस्थिति भीषण आहे

### आरोग्याच्या योजनांचा व वैद्यकीय शास्त्राचा दुष्परिणामच होतो म्हणावयाचा !

१९४९ मध्यें केलेल्या अंदाजाप्रमाणें जागतिक लोकसंख्या त्यावेळीं २३८ कोटी होती. त्यांत आतांपर्यंत बरीच भर पडली असावी. जमीनीखालील क्षेत्रांत त्या मानानें वाढ होणें अशक्य आहे; उलट कांहीं जमीन उत्पादनाच्या दृष्टीनें कनिष्ठच झाली असली पाहिजे. शेतीच्या पद्धतींत सुधारणा झाली, तरच लोकांना सध्यां जेवढें अन्न मिळतें तेवढें तरी मिळूं शकेल. १९४५ नंतर अन्नधान्याखालील क्षेत्र ३% वाढलें व दर एकरी उत्पादन ६% वाढलें म्हणजे अन्नाचें उत्पादन ९% वाढलें, पण लोकसंख्येंत १३% वाढ झाली.

लोकसंख्या व अन्नपुरवठा ह्या विषयावर अनेकांनीं आपले विचार मांडले आहेत. येत्या शतकांत सार्वत्रिक दुष्काळ पडेल असें त्यांतील कांहीं म्हणतात, तर कांहीं आशावादी पुढारलेल्या देशांत लोकसंख्येची वाढ स्थगित झाली आहे इकडे बोट दाखवून, ही प्रवृत्ति जगभर फैलावेल अशी आशा व्यक्त करतात. ज्या देशांत लोकसंख्या स्थिर झाली आहे, अशा सर्व देशांची एकूण लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या १०% सुद्धां नाहीं !

काही लेखकांना अन्नाच्या उत्पादनांत क्रांतिकारक फरक होण्याची स्वप्नें पडत आहेत. ( उदाहरणार्थ, झाडपाल्यापासून अन्न, कोळशापासून अन्न, हवेपासून साखर, इत्यादि. )

येत्या चाळीस–पन्नास वर्षांपुरता विचार केला, तर दुष्काळाची भीति देशांदेशांतून कमी–अधिक प्रमाणांत आढळते. ( १ ) अमेरिका, कॅनडा, स्वीडन आणि फ्रान्स ह्यांत लोकसंख्या स्थिर होण्याच्या मार्गावर आहे, जर्मनि पुरेशी आहे आणि शेतीची प्रगति जलद होत आहे. ( २ ) रशिया, अर्जेंटिना, ब्राझील आणि आफ्रिकेंतील कांहीं मोठे प्रदेश ह्यांत जमिनीची संपत्ति विपुल असून, अन्नाचें उत्पादन परदेशीं निर्गत करण्याइतकें भरपूर होतें. तेथें शेतीच्या वाढीस व सुधारणेस पुष्कळच वाव आहे जागतिक विचार केला, तर अन्नाच्या उत्पादनाचे मानानें औद्योगिक उत्पादन अधिक जलद वाढत आहे. त्यामुळें, ह्या देशांच्या पिकास अधिकाधिक चांगली किंमत येऊन, निर्गतीसाठी शेतीचें उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन मिळेल. ( ३ ) तिसऱ्या गटांत भारत, पाकिस्तान, मध्यपूर्व, आफ्रिकेचा कांहीं भाग, वेस्ट इंडीज हे प्रदेश येतात. येथें जनतेला सध्याच फार थोडें अन्न वांट्यास येतें, दर माणशीं जमिनीचें क्षेत्र थोडें आहे, जननसंख्या मोठी आहे, शेतकरी निरक्षर आहेत, जमीनधारा पद्धति असमाधानकारक आहे, विचार, संवयी व धार्मिक कल्पना ह्या सर्व प्रगतीस आड येणाऱ्या आहेत. हे देश शेतीप्रमाणें उद्योगधंद्यांतहि मागासलेले आहेत आणि इतर मोबदला देऊन अन्न आयात करतां येण्याजोगी त्यांची परिस्थिति नाहीं, आरोग्याचे बाबतींत जी कांहीं सुधारणा झालेली आहे, तिचेमुळे अन्न प्रश्न बिकट होण्यासच मदत झालेली आहे. वैद्यकीय शास्त्राच्या प्रगतीचा परिणामहि अशाच प्रकारचा होणार आहे. भारतांतील अर्भकांची जगण्याची अपेक्षा सरासरीनें २३ वर्षें आहे, तर ग्रेट ब्रिटनमध्यें ती ४६ व स्वीडनमध्यें ४३ वर्षें आहे. भारतांतील ही अपेक्षा वाढण्यास व अन्नप्रश्न बिकट होण्यास कितीतरी वाव आहे ! ( ४ ) हॉलंड, ब्रिटन व जपान हे शेवटच्या गटांत येतात. सध्याचा अन्नपुरवठा कायम राखण्यास ह्या देशांतील जमीनसंपत्ति अगदी अपुरी आहे, त्यांपैकीं जपानमधील अन्नपुरवठा भयंकरच अपुरा आहे; हॉलंड व ग्रेटब्रिटन ह्यांच्या उलट जपानमध्यें जननसंख्या मात्र मोठी आहे. तयार मालाची निर्गत करून, आगबोटींतून दुसऱ्याचा माल वाहून, व्यापार वगैरे करून, ह्या देशांनीं अन्नाची आयात गेल्या एक–दोन पिढ्या केली. अन्न व कच्चा माल ह्यांच्या किंमतींचे मानानें तयार मालाच्या किंमती वाढणार नसल्यानें, ह्या देशांतील आर्थिक संसारास अधिकाधिक ताण बसत जाणार हें उघड आहे. त्यांना आयातीस कात्री लावून निर्गत वाढविण्याची कोशीस करणें भाग आहे.

### सिमला येथील छापखान्याचें स्थलांतर

भारत सरकारचा छापखाना सध्यां सिमला येथें आहे. तेथून तो हलवून फरिदाबाद येथें नेण्याचें ठरलें आहे. फरिदाबाद ह्या निर्वासितांसाठीं वसविलेल्या गांवांत त्यामुळें उद्योग उपलब्ध होऊन शेकडों निर्वासितांना काम मिळेल.

### रेल्वे बुकस्टॉलसवर रशियन पुस्तकें नकोत

रेल्वे स्टेशनांतील बुकस्टॉलसवर सोव्हिएट पुस्तकें विकली जाऊं देऊं नयेत, अशी सूचना रेल्वे अधिकाऱ्यांना भारत सरकारनें केली आहे.

### कलकत्ता बंदराच्या विकास–योजनेचा तपशील

१८७० सालीं कलकत्ता बंदरांत फक्त चार लहान धक्के होते. आज कलकत्ता हें भारतामधील सर्वांत मोठें बंदर असून दर वर्षी इतर सर्व मोठ्या भारतीय बंदरांतून मिळून मालाची जितकी चढउतार होते, तितकी एकट्या कलकत्ता बंदरांतच होऊं लागली आहे. राष्ट्रीय नियोजन मंडळानें बंदराच्या विस्तारासाठीं एक मोठा आराखडा आखला आहे. ह्या आराखड्याचे दोन भाग असून दोन्ही भागांना मिळून २५ कोटी रुपये खर्च येणार आहे. पहिल्या भागासाठीं सुमारें ९·५ कोटी रुपये खर्च येईल. बंदराची सध्याची कार्यक्षमता टिकवून धरण्यासाठींच एवढा खर्च करावा लागणार आहे. सध्यापेक्षा अधिक माल चढविण्या–उतरण्यासाठीं मात्र बंदरांतील सोयींचा अधिक विस्तार करणें जरूर आहे. पुढील पांच वर्षांत हें काम पुरें करण्याचा विचार चालू आहे. नवीन सोयींसाठीं ६ कोटी रुपये खर्च करावा लागेल. हुगळी नदीच्या तळांत वाळू भरून येऊन वाहतुकीला धोका उत्पन्न होतो. नदीची उपयुक्तता वाहतुकीच्या दृष्टीनें कायम राखण्यासाठीं ५० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. ह्याशिवाय किदरपूर येथील गोदींचें आधुनिकीकरण, आगीविरुद्ध बचावाचीं साधनें, ड्रेजर्सची खरेदी व एक इस्पितळ ह्यांच्यावर ३·५ कोटी रुपये खर्च केले जातील. दुसऱ्या भागांत खर्च होणाऱ्या रकमेपैकीं ४·५ कोटी रुपये गोद्यांचा विकास करण्यासाठीं राखून ठेवण्यांत येणार आहेत.

पुणें येथील इंडिअन रिव्हर ऑब्झरव्हेटरी येथें हुगळी नदीच्या पात्राचा एक नमुना तयार करण्यांत आला होता. त्या नमुन्याचा अभ्यास करून हुगळी नदींत वाळू साठूं न देण्यासाठीं महत्त्वाच्या सूचना करण्यांत आल्या आहेत. वरील नमुना तयार करण्यासाठींच ९ लाख रुपये खर्च आला होता. बरीच वर्षें अभ्यास केल्यावर ऑब्झरव्हेटरींतील संशोधकांना असें आढळून आलें कीं कलकत्ता आणि डायमंड हार्बर ह्यांच्या दरम्यान हुगळी नदींत ७ ठिकाणीं वाळूचे उंचवटे आहेत. ही वाळू साठूं नये म्हणून नव्या हौरा पुलापलीकडे नदीला बांध घालावे आणि ज्या वळणामुळें वाळू सांठण्यास मदत होते तीं वळणें सरळ करून घ्यावी अशा सूचना करण्यांत आल्या आहेत. असें केल्यानें हुगळी नदींतील वाहतूक बऱ्याच प्रमाणांत वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. ज्या बोटींचे खालचे भाग २० फुटापेक्षा अधिक खोल पाण्यांत बुडालेले असतात अशा बोटींना ह्या वाळूच्या उंचवट्याच्या भागांतून जातांना सध्या फारच अडचण पडते. पुष्कळदा त्यांना पौर्णिमेच्या भरतीची वाट पहात थांबून रहावें लागतें. पुण्याच्या प्रयोगशाळेनें कलकत्ता बंदरासंबंधीं केलेल्या सूचना नियोजन–मंडळानें आपल्या विकास–योजनेंत सामील करून घेतलेल्या आहेत. कलकत्त्याचें बंदर आणि हुगळी नदींतील वाळूच्या उंचवट्याचीं ठिकाणें ह्यांना जोडणारा ५० मैलांचा एक कालवा खणण्याचीहि शिफारस करण्यांत आली आहे.

## औंध म्युच्युअलचे नवे चेअरमन

### श्री. शंतनुराव किर्लोस्कर

औंध म्युच्युअल विमा सोसायटी लि. च्या ८ जून रोजींच्या डायरेक्टर बोर्डाच्या बैठकींत श्री. शंतनुराव किर्लोस्कर, ( किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. ) ह्यांची बोर्डाचे चेअरमन म्हणून सर्वानुमतें निवड करण्यांत आली, असें समजतें.

## मराठा चेंबरचें १९५१–५२ मधील कार्य

अहवालाच्या वर्षातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे कोयना योजनेचा पुरस्कार होय. नियोजन मंडळाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कोयना-योजनेचा समावेश व्हावा यासाठी चेंबरनें प्रयत्न केले.

### लहान गिरण्यांची परिषद्

चेंबरच्या प्रयत्नानें मुंबई राज्यांतील लहान व सद्यःपरिस्थितींत आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण नसलेल्या गिरण्यांना सुताच्या भावाबाबत न्याय्य सवलत मिळाली होती. अहवालाच्या वर्षी मुंबई सरकारनें या सवलती कमी करण्याचें धोरण जाहीर केलें, यामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करण्याकरितां चेंबरच्या विद्यमानें मुंबई राज्यांतील लहान गिरण्यांच्या चालकांची परिषद् चेंबरचे इमारतींत बोलावण्यांत आली. चेंबरनें पुनः खटपट केली व अहवालाच्या वर्षी लहान गिरण्यांना अंशतः सवलत पुनः मिळाली आहे. या गिरण्यांचा प्रश्न कायमचा सोडवण्याच्या दृष्टीनें चेंबरचे प्रयत्न चालू आहेत.

### यंत्रमागांच्या सूतपुरवठ्याचा प्रश्न

यंत्रमागांच्या बाबतींत सूत-पुरवठ्याच्या प्रश्नाकडे चेंबरनें अहवालाच्या वर्षी लक्ष पुरविलें. यंत्रमाग, होजियरी व हातमाग यांना सुताचे स्वतंत्र कोटे दिले जावेत हें चेंबरचें म्हणणें सरकारनें तत्त्वतः मान्य केलें. विणकामाच्या या तीन शाखांची सुताची गरज शास्त्रीय पद्धतीनें ठरवून द्यावी व जोपर्यंत यंत्रमागांना त्यांच्या किमान गरजेइतकेंहि ठराविक नंबरचें सूत सरकार सतत देत नाहीं तोंपर्यंत यंत्रमाग कापडाच्या किंमती नियंत्रित केल्या जाऊं नयेत, अशा मागण्या चेंबरनें मांडल्या. त्याहि अंशतः मान्य झाल्या.

अहवालाच्या सालीं कोको-चाकोलेट, सूत कापड, रंग व स्पिंडल टेप्स या धंद्यांचे प्रश्न आयात-नियंत्रण धोरणांतील अडचणी दूर करण्याचे दृष्टीनें हातीं घेतले.

### आयातीवर निर्बंध : संरक्षणाचा उपाय

उद्योगधंद्यांच्या संरक्षणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या टॅरिफ कमिशन नेमणुकीचें चेंबरनें स्वागत केलें व सद्यः-परिस्थितींत धोरण म्हणून परदेशीय मालाच्या आयातीवर परिणामी निर्बंध हाहि संरक्षणाचा प्रभावी उपाय म्हणून त्याची शिफारस करणें कमिशनला शक्य होण्याच्या दृष्टीनें कायद्यांत तरतूद करावी अशी सूचना केली. कोको चाकोलेटचा धंदा संरक्षित असूनहि मे. कॅडबरी, फ्राय, या ख्यातनाम ब्रिटिश कंपन्यांना भारतांत कारखाना काढण्यास परवानगी दिल्याबद्दल सरकारशीं पत्रव्यवहार सुरू आहे.

सूत व कापडासाठीं रंग तयार करण्याचा धंदा बाल्यावस्थेंत असला तरी कार्यक्षमता, शक्यता, या सर्व दृष्टींनीं भारतीय धंद्याची परिस्थिति चांगली असल्यानें कांहीं जातींच्या रंगांबाबतची आयात नियंत्रित करावी अशी सूचना केली. संपूर्णतया भारतीय मालकीच्या व भारतीय रसायनशास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांनीं चालविलेल्या असोसिएटेड रिचर्स लेबोरेटरीज यांना 'पिरेडिन' हें रसायन मिळवून देण्याबाबत चेंबरनें यशस्वी प्रयत्न केले.

चेंबरचें मुखपत्र "संपदा" त्याचीहि योग्य दिशेनें प्रगति होत आहे. व्यापारी-कारखानदारांस जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या आर्थिक विषयांचा 'संपदा' परामर्श घेत असल्यानें, चेंबरच्या सदस्यांखेरीज अन्य वाचकवर्गांतहि तिचा प्रसार होत आहे.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

## दैनंदिन जीवनास बँकिंगचा आधार

( "भगिनी" मासिकांत प्रथम प्रसिद्ध झालेला श्री. श्री. वा. काळे यांचा हा लेख "भगिनी"च्या संपादकांचे परवानगीनें व सौजन्यानें येथें उद्धृत केला आहे. -संपादक. )

एका शाळेच्या तपासणीसाठी इन्स्पेक्ट्रेस बाई गेल्या असतांना, त्यांनीं ११ व्या यत्तेंतील कांहीं मुलींना प्रश्न विचारला, "ह्या गांवांत कितीतरी बँका आहेत; त्यांचा नागरिकांना काय उपयोग होतो?" बँक हा शब्द जरी परिचयाचा असला, तरी त्या संस्थेचा व सामान्य नागरिकांचा कांहीं संबंध येतो, अशी शंकाहि कित्येकांना येणार नाहीं, तर त्यांत काय नवल? बँकेंत पैसे ठेवतात, एवढें पुष्कळांना ठाऊक असतें. परंतु, किती लोकांची बँकेंत खातीं असतात? फारच थोड्यांची. मग बँकेचा उपयोग? आपल्या रोजच्या जीवनास बँकांची कांहीं मदत होत असते काय? ह्यासंबंधीं जरा तपशीलवार विचार करणें योग्य होईल

आपण पुष्कळ वेळां शेजारच्या वाण्याकडे किंवा केमिस्टच्या दुकानाकडे मोड मागण्यासाठी जातों. आपण बंदा रुपया किंवा नोट देऊन त्याची मोड घेतों. पण, दुकानदाराजवळ मोड कोठून येते? हे दुकानदार दररोज बँकेंतून मोड आणून ठेवीत असतात. त्यामुळें त्यांचे व्यवहार सौकर्यानें चालू शकतात. असें त्यांनीं केलें नाहीं तर त्यांना गिऱ्हाइकांना उधार माल द्यावा लागेल. बँका मोड पुरवीत असल्याकारणानें दुकानांचे पैशाचे व्यवहार व्यवस्थित चालून गिऱ्हाइकांचीहि सोय होते.

आपण दुकानांतून कापड, वगैरे खरेदी करतों. सोनाराकडून दागिने करून घेतों. स्टेशनरीच्या दुकानांतून माल घेतों. खरेदी झाल्यानंतर आपण पैसे देतों. परंतु दुकानदारानें मात्र त्याच्या दुकानांतील मालाची किंमत अगोदरच देऊन टाकलेली असते. म्हणजे, दुकानदारानें आगाऊ पैसे देऊन माल भरलेला असतो आणि विक्री रक्कम मात्र कालांतरानें त्याच्या हातीं येते. ह्या मधल्या काळांतील त्याची गरज बँक भागविते. म्हणजे, बँकेच्या मदतीमुळेंच दुकानदार गिऱ्हाइकांच्या अपेक्षित मागणीस योग्य असा माल आणून ठेवूं शकतो. बँकेच्या मदतीचे अभावीं गिऱ्हाइकांची उत्कृष्ट सेवा दुकानदार करूं शकलाच नसता; पण गिऱ्हाइकांस मात्र हें कळूं शकत नाहीं. कांहीं माल तर परदेशांतून आयात करावा लागतो. ह्या व्यवहारासहि बँकांचें सहाय्य असतें. म्हणूनच जगांतील कोणत्याहि ठिकाणचा माल आपणांस इच्छेप्रमाणें मिळूं शकतो.

आपलें रोजचें वर्तमानपत्र घ्या. तें काढणाराला त्यासाठी छापखाना लागतो, कागद घेऊन ठेवावा लागतो. म्हणजे दररोज सकाळीं वर्तमानपत्राची किरकोळ विक्री करून एकएक आणा जमविण्यापूर्वींच त्याच्या खर्चाची व्यवस्था झालेली असते. वर्तमानपत्राच्या छापखान्याची यंत्रसामुग्री घेण्यासाठी बँक कर्ज देऊं शकते. त्याचप्रमाणें, कागदाचा सांठा करून ठेवण्यासाठी बँक पैसे देते, वापरासाठी कागद पाहिजे त्याप्रमाणें वर्तमानपत्रकार घेऊं शकतो; त्या प्रमाणांत बँकेचे पैसे भरून तो कागद फक्त सोडवून घ्यावयाचा म्हणजे झालें.

कित्येक पगारदार लोकांचा पगार निश्चित असला, तरी त्यांत अनपेक्षित खर्चास वाव नसतो. शस्त्रक्रिया, बाळंतपण, लग्नकार्य, इत्यादींसाठी एकदम मोठी रक्कम लागते आणि ती एखाद्या महिन्याच्या पगारांतून भागवितां येणें अशक्यच असते. बँका अशा वेळीं मदत करूं शकतात आणि पगारदार नोकर त्या कर्जाचे फेड पुढें सोइस्कर हप्त्यांनीं करूं शकतात. अशी सोय नसती, तर मध्यम वर्गांतील कितीतरी कुटुंबांचे हाल झाले असते. बँकांच्या सेवेची ही उपयुक्तता पुष्कळांच्या परिचयाची आहे.

आपल्या गांवांत कित्येक गिरण्या व कारखाने आहेत. त्यांत काम करून कितीतरी लोकांचें पोट भरत असतें. ह्या गिरण्या व कारखाने चालू राहण्यासाठी त्यांच्या पाठीशीं बँका उभ्या असाव्या लागतात. मुंबईहून सूत मागवून तें गुदामांत ठेवावयाचें, तर मोठी रक्कम अडकून पडते. बँका त्यासाठी रक्कम देतात व गिरण्यावरील आर्थिक ताण कमी करतात. कागदाच्या गिरणीचा कागद तयार होऊन त्याची विक्री होईपर्यंतच्या मधल्या काळांत गिरणीस बँका मदत करून त्यांना खेळतें भांडवल पुरवितात. साखर किंवा गूळ ह्या बाबतींतहि असेंच घडतें. म्हणजे, जीवनोपयोगी जिनसा उपलब्ध होण्यासाठी, त्यांचें उत्पादन होण्यासाठी व त्यांत रोजगार मिळण्यासाठी बँकांचें सतत सहाय्य होत असतें.

जी गोष्ट चालू कारखान्यांची, तीच गोष्ट नव्यानें निघणाऱ्या कारखान्यांची. आज आपल्याला वीज स्वस्त मिळूं शकते, परंतु खोपोली येथें विजेचा कारखाना उभारणें, लोणावळ्याजवळ पाण्याच्या सांठ्यासाठीं धरण बांधणें, खोपोलीहून मुंबई–पुणें येथं वीज वाहून नेण्याची व्यवस्था करणें, तेथून तिचें घरोघरीं वाटप करणें, ह्या सर्वांच्या पूर्वतयारीस कोट्यावधि रुपये लागले. आपण वीज वापरल्यावर महिनाअखेर त्याचे तीन–चार रुपये बिल देणार, पण ती वीज प्रत्यक्ष उपलब्ध होण्यापूर्वींच्या साहसी उपक्रमांत बँकांचें पाठबळ नसतें, तर आज विजेचा दिवा व पंखा आपणांस मिळूंच शकला नसता; ट्रामगाडीहि दिसली नसती आणि रेडिओहि इतक्या सोईनें ऐकावयास मिळाला नसता.

मुंबई–पुणें इत्यादि ठिकाणीं आतां पुष्कळांनीं सहकारी हौसिंग सोसायट्यांचे द्वारा घरें बांधलीं आहेत. कित्येकांनीं मोठ्या सहकारी इमारतींत पैसे भरून ब्लॉक घेतले आहेत. ज्यांना मुंबईमध्यें स्वतःच्या मालकीचा ब्लॉक मिळण्याची कधींहि आशा नव्हती, असे लोक आतां घरमालक किंवा ब्लॉकमालक बनले आहेत. पंधरा हजार रुपयांच्या घराच्या किंमतींपैकीं आज दोन–तीन हजार रुपये द्यावयाचे, बाकीची रक्कम दरमहा हप्त्यानें द्यावयाची व मालकीहक्क मिळवावयाचा, अशी ही योजना असते. पण कंत्राटदाराची रक्कम घर बांधताक्षणींच द्यावी लागते. बँका पुढें येऊन, तो खर्च भागवितात आणि सोसायटीच्या सभासदास सोइस्कर व्याजानें व हप्त्यानें घर मिळूं शकतें. बँकांची ही मदत आहे, म्हणून आज कितीतरी मिळवते पुरुष सहकुटुंब एकत्र राहूं शकत आहेत. सामाजिक स्वास्थ्यास बँकांचें होणारें हें साहाय्य केवळ पैशानें मोजून भागणार नाहीं.

पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशननें दोन वर्षांपूर्वीं सुमारें ४५ लक्ष रुपयांचीं कर्जें उभारलीं. शहरांतील रस्त्यांची शास्त्रशुद्ध सुधारणा, लकडी पूल रुंद करणें, मुठा नदीचें क्षेत्र सुधारून आरोग्याच्या सुखसोयी वाढविणें, नवीन मार्केटस् बांधणें, पाणी पुरवठ्याची योजना सुधारणें, कॉर्पोरेशनच्या मालकीच्या बस सर्व्हिसचा प्राथमिक खर्च करणें, इत्यादि मोठ्या व भांडवली खर्चाच्या योजनांसाठी हें कर्ज काढण्यांत आलें. "हीं कर्जें लोकांनी दिलीं नाहींत, तर आम्हीं देऊं" अशी अंडर राइटिंगची हमी पुण्यांतील अग्रेसर बँकांनीं दिली होती. त्यामुळें जनतेसहि विश्वास वाटून कॉर्पोरेशनला कर्जें अल्प व्याजानें मिळूं शकलीं. अशाच तऱ्हेची मदत कित्येक बँका ठिकठिकाणीं वारंवार करीत असतात. जंगली महाराज रोडनें संभाजी पार्कमध्यें फिरावयास जाणाऱ्या

नागरिकांच्या सौख्यास बँकांनीं हातभार लावलेला आहे, हें त्यांना माहितहि नसतें. लकडी पुलावरील वहातुकीची गर्दी आतां कमी होईल त्याच्या पाठीशीहि अप्रत्यक्षपणें बँका आहेतच. सोमवार पेठेतील पोहण्याचा तलाव बँकांच्या अप्रत्यक्ष सहाय्यामुळेंच शक्य झाला. शहरवासीयांच्या सुखास व सोयींस अशा रीतीनें लोकांना नकळत बँकांनीं भर घातलेली आहे. पुणें शहरांतील लोकांच्या परिचयाची ही गोष्ट असल्यानें तिचा जरा विस्तारानें उल्लेख केला आहे; इतर कित्येक शहरांसंबंधींहि असेंच सांगतां येईल.

युद्धकाळांत जीवित धोक्याचें झालें होतें, तेव्हां बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें मौल्यवान जिनसा व कागदपत्र नेऊन ठेवण्याच्या सोईचें महत्त्व बऱ्याच लोकांना तात्काळ पटलें. आतां घरीं दागदागिने न बाळगतां ते बँकेंत नेऊन ठेवणें कित्येकांना नित्याचें होऊन बसलें आहे. उन्हाळ्यांत, गच्चीवर किंवा अंगणांत निजलें किंवा कुलूप लावून सिनेमा–नाटकाला गेले, तरी दागिने चोरीस जाण्याच्या भीतीचें निवारण सहज होऊं शकतें. अगदी किरकोळ मोबदल्यांत बँका रक्षणाचें हें काम करतात. जरूर लागेल, तेव्हां सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें जाऊन पांच मिनिटांत आपण हवे ते जिन्नस आणूं शकतों व काम झाल्यावर ते परत नेऊन ठेवूं शकतों. ह्या सोईमुळें कितीतरी स्वास्थ्य लाभूं शकतें. दागिन्या-प्रमाणें विमा पॉलिसी, रोखे, इत्यादि कागदपत्रांचें जतनहि असें करतां येतें. मोठाल्या ट्रंकाहि सील लावून तेथें ठेवतां येतात.

कित्येक लोक पैसे रोख्यांत किंवा ठेवींत गुंतवितात. त्यांचा हेतु मुलांच्या शिक्षणाची तरतूद करणें असा असतो. पण, हे लोक आपली इच्छा नीट साध्य व्हावी, अशी योजना करून ठेवीत नाहींत आणि पैसे भलत्याच्या हातीं जातात, ते खर्चून जातात किंवा बुडतात. विश्वस्त म्हणून बँकांची जी उपयुक्तता आहे, त्याची माहिती अद्याप फार लोकांना झालेली नाहीं. पैशाचा विनियोग कसा करायचा आहे, तें ठरवून टाकून पुढील व्यवस्था बँकेकडे सोपविली तर सर्व गोष्टी वक्तशीर व सूत्रवत होऊं शकतात आणि मुलांच्या शिक्षणाची पद्धतशीर व्यवस्था होऊं शकते.

बँकांची उपयुक्तता समाजाच्या परिस्थितीवर अवलंबून असते. पुढारलेल्या देशांतील बँकांची सेवाहि अधिक विविध प्रकारची असते, आणि आपल्याला कल्पनाहि येणार नाहीं, अशा गोष्टी तेथील बँका करीत असतात. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील बँका त्यांच्या गिऱ्हाइकांना, पाऊस पडूं लागला कीं छत्र्या पुरवितात! बँकांच्या आवारांत प्रदर्शनें भरविलीं जातात!

आपल्या इकडील बँकाहि त्यांची उपयुक्तता वाढवीत आहेत. माथेरान सारख्या हवा खाण्याच्या ठिकाणीं जाणारांच्या सोईसाठी एक बँक मोसमापुरती शाखा तेथें उघडीत असते, हें त्याचच निदर्शक आहे. बँकांच्या कामगिरीची सविस्तर यादी देण्याचा येथें उद्देश नाहीं; इतकेंच नव्हे तर कित्येक महत्त्वाच्या कार्यांचा येथें उल्लेखहि आलेला नाहीं. सामान्य नागरिकांच्या जीवनास बँकांचा कसा मोठा, परंतु अदृश्य आधार असतो, एवढेंच दाखवून देण्याचा हा प्रयत्न आहे. बँकिंगची संवय लोकांना जेवढी लागेल, तेवढ्या प्रमाणांत त्यांच्या कार्याची उपयुक्ततताहि वाढेल. तेव्हां पुरुषां-प्रमाणें स्त्रियांनीं व मुला–मुलींनींहि बँकांच्या सेवेस, त्यांचेशीं व्यवहार करण्याची संवय लावून घेऊन, हातभार लावला तर त्यांच्या व समाजाच्या सोईंत व सौख्यांत भरच पडेल.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.



१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

## वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठीं

वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ

## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर–ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें–१

फोन नंबर— ३४०२

### सुताच्या उत्पादनांत घट : निर्गतीस परवानगी

सुताच्या उत्पादनांत वाढ होऊन त्याचा उठाव होत नसल्या-कारणानें, हिंदी कपाशीपासून बनविलेल्या सुताच्या निर्गतीस सरकारनें कांहीं अटींवर परवानगी दिली आहे. १८ आणि २० नंबरच्या (सिंगल व फोल्डेड) सुताची निर्गत होऊं दिली जाणार नाहीं. १ मे, १९५२ पूर्वी पॅक केलेलें सूतच बाहेर पाठवितां येईल आणि ३१ ऑगस्टपूर्वी तें रवाना झालें पाहिजे. सुताचें उत्पादन खालीलप्रमाणें वाढत गेलें आहेः—

| | |
|---|---|
| १९५१ | गाठी |
| जानेवारी | ३२,००० |
| डिसेंबर | ७२,००० |
| १९५२ | |
| जानेवारी | ६९,१९६ |
| फेब्रुवारी | ६६,६९९ |
| मार्च | ७०,४२८ |
| एप्रिल | ६७,९३४ |

### पेट्रोलवरील कर वाढणार

बॉंबे सेल्स ऑफ मोटर स्पिरिट टॅक्सेशन ॲक्ट, १९४६ मध्यें दुरुस्ती करण्यांत येणार आहे. त्यामुळें पेट्रोलवर सध्यां कमाल १२·५% कर घेतां येतो, तो कमाल १८·७५% घेतां येईल. इतर राज्यांच्या मानानें मुंबई राज्यांतील कराचा दर कमी होता, असें ह्या दुरुस्तीचें समर्थन करण्यांत येत आहे. ह्या कराच्या उत्पन्ना-पैकीं निम्में उत्पन्न सर्वसाधारण जमेंत समाविष्ट होईल व निम्में उत्पन्न रस्ते सुधारण्यासाठी रोड फंडांत दाखल केलें जाईल.

जरी कमाल सम्मत दर १२·५% होता, तरी सरकार ६¼% दरानेंच कर आकारीत असे. १८ जूनपासून सरकारनें १२·५% कर लादण्यास प्रारंभ करून, कायद्याचा ज्यातींत ज्यास्त फायदा घेण्यास प्रारंभ केला. नव्या दुरुस्तीमुळें सरकारला १८·७५% दरानें कर लादतां येईल. ६¼% दरानें सरकारला दर-साल ६० लक्ष रुपये उत्पन्न मिळे. १२·५% दरानें तें १ कोटी, २० लक्ष रुपये होईल आणि १८·७५% कर बसवला, तर तें १ कोटी, ६० लक्ष रुपयांवर जाईल. मोटार–गाड्यांवरील करांतहि वाढ करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यामुळें, सरकारी तिजो-रींत आणखी ७० लक्ष रुपयांची भर पडूं शकेल.

### भारतांतील परदेशीय गुंतवणूक

भारतांतील दीर्घकालीन परदेशीय हुंडणावळींचे ३० जून, १९४८ रोजींचे आंकडे खालीलप्रमाणें आहेतः—

| | | |
|---|---|---|
| उद्योगधंद्यांत | : | ३२०·४२ कोटी रु. |
| सरकारी रोख्यांत | : | २९२·६९ कोटी रु. |
| एकूण | : | ६१३·११ कोटी रु. |

एकूण गुंतवणुकीची देशवार वर्गवारी खालीलप्रमाणें होतीः—

| | | |
|---|---|---|
| ग्रेट ब्रिटनमधील | : | ४७०·६२ कोटी रु. |
| अमेरिकेंतील | : | २०·५३ कोटी रु. |
| इतर देशांतील | : | १२१·९६ कोटी रु. |
| एकूण | : | ६१३·११ कोटी रु. |


# बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

## –संचालक मंडळ–

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
१ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षें ४ टक्के.

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २. — गो. ग. साठे, मॅनेजर.



# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

( स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक )

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद्र रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.